नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १९/०१/२०२५ (रविवार) सकाळ**

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पोस्टे वेलतूरः— दि. १८/०१/२०२५ रोजी वेलतूर पोलिसांना मुखबीर द्वारे खात्रीशीर खबर मिळाली की, मौजा वेलतुर ते चन्ना रोड चन्ना शिवार येथे बोलेरो वाहन क्र. एम एच—३२/क्यु ००२५ मध्ये अवैद्यरित्या कत्तलीकरीता जनावरे कोंबून वाहतूक करीत आहे. अशा माहिती वरून मौजा वेलतुर ते चन्ना रोड चन्ना शिवार येथे नाकाबंदी केली असता बोलेरो वाहन क्र. एम एच—३२ क्यु ००२५ चा चालक **आरोपी नामे— १) चेतन विश्वनाथ मुडले वय ३० वर्ष** याने **आरोपी क्र. २) कवडु रामाजी रंगारी वय ६५ वर्ष दोन्ही रा. चापेगडी ता. कुही जि. नागपुर** याच्या सांगण्यावरून आपल्या ताब्यातील बोलेरो वाहन क्र. एम एच—३२/क्यु ००२५ मध्ये ०२ गौवंश गायी व ०२ बच्छडे (वासरु) एकुण ०४ गोवंश जनावरे निर्दयतेने कोंबुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने आरोपी याचे ताब्यातुन बोलेरो वाहन क्र. एम एच—३२ क्यु ००२५ किंमती ३,०००००/— रु., ०२ गौवंश गायी प्रत्येकी कि. १०,०००/— एकुण २००००/—रू व ०२ बच्छडे (वासरु) प्रत्येकी कि. ३०००/— रू. एकुण किंमती ६०००/— रू ३,२६,०००/—रु. चा माल जप्त केला.

सदर प्रकरणात पोलिसांनी **आरोपी नामे— १) चेतन विश्वनाथ मुडले वय ३० वर्ष** याने **आरोपी क्र. २) कवडु रामाजी रंगारी वय ६५ वर्ष दोन्ही रा. चापेगडी ता. कुही जि. नागपुर** याचे विरुद्ध कलम ११(१)(ड) प्राण्यांना कुरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० सहकलम ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ अन्वये गुन्हा नोंद केला असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर